# “जैन टिश्यूकल्चर” केळी लावा आणि नेहमीपेक्षा दुप्पट उत्पादन मिळवा !!!

**लागवडीची वेळ:**

टिश्यूकल्चर केळीची लागवड कमी तापमान व जादा तापमानाचा कालावधी वगळता वर्षभर करता येते. ठिबक सिंचनाची सुविधा असणे महत्वाचे आहे.

**मृग बाग:** महिना जून-जूलै

**कांदे बाग:** महिना ऑक्टोबर-नोव्हेंबर



**लागवड:**

जमीनीची चांगली मशागत (नांगरणी व वखरणी) झाल्यावर निवड केलेल्या अंतरावर खड्डे करावेत. खड्ड्यामध्ये २-३ किलो शेणखत, माती व ५ ग्रॅम फोरेट, २०० ग्रॅम निंबोळी पेंड मिसळून भरावे व नंतर खड्ड्यात मध्यभागी रोपांची पिशवी काढून लागवड करावी.

**जमीन:**

भारी, कसदार, गाळाची, पोयट्याची भरपूर सेंद्रीय पदार्थ असणारी, चांगला निचरा होणारी जमिन केळी लागवडीसाठी योग्य असते.

**लागवडीचे अंतर:**

६’x६’ किंवा ६’x५’ किंवा ७’x४’ ह्या अंतरावर १’x१’x१’ आकाराचे खड्डे करावेत.

**पाणी व्यवस्थापन:**

लागवड झाल्यानंतर त्वरीत ठीबक सिंचनाने पाणी द्यावे. जमीन वाफसा अवस्थेत राहील एवढेच पाणी द्यावे. जादा अथवा कमी पाणी देऊ नये. केळीच्या पूर्ण वाढलेल्या झाडास जास्तीत जास्त २० ते २५ लिटर पाण्याची गरज असते.

| महिना | जून | जूलै | ऑगस्ट | सप्टें. | ऑक्टो. | नोव्हें. | डिसें. | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाण्याची | **लागवड** ५-६ | ४-५ | ५-६ | ६-८ | ८-१० | ८-१० | ६-८ | १०-१२ | १२-१४ | १६-१८ | १८-२० | २०-२२ |
| गरज लि./ दिवस/झाड | १२-१४ | १२-१४ | १२-१४ | १४-१६ | **लागवड** ४-६ | ४-६ | ४-६ | ५-७ | ६-८ | १०-१२ | १२-१४ | १२-१४ |

**विद्राव्य खतांचा वापर:**

ठीबक सिंचना सोबत पाण्यात संपूर्णपणे विरघळणाऱ्या विद्राव्य खतांचा वापर करावा. त्यामुळे रासायनिक खतांच्या वापरामध्ये बचत होते, ठिबक सिंचन संचात क्षार साचत नाहीत. उत्पादनात भरीव वाढ होते.

**फर्टिगेशनसाठी खतांची मात्रा:**

नत्र-१७० : स्फुरद-४५ : पालाश - १८५ ग्रॅम प्रती झाड.

एकूण - २१८:६५:२७२ कि/एकर

लागवडीचे अंतर: ’६ ५’ (१४५२ झाडा करीता)

| खते देण्याची वेळ | ग्रेड | एकूण खते (किलो) | दररोज द्यावयाची मात्रा (किलो/एकर) |
|---|---|---|---|
| रोपे लागवडी नंतर १ ते ९० दिवस | १९:१९:१९ (सु.अ.)+<br>१३:०:४६ +<br>युरिया | १९२<br>९३<br>७० | २.१३०<br>१.०३३<br>०.७७७ |
| ७५ दिवसांनी | सुक्ष्म अन्न द्रव्य<br>मॅग्नेशियम सल्फेट | १४.५०<br>३६.३० | १० ग्रॅम प्रति झाड<br>२५ ग्रॅम प्रति झाड |
| ९१ ते १५० दिवस | ०:५२:३४ +<br>१३:०:४६ +<br>युरिया | ५९<br>८२.५<br>११७.५ | ०.९८३<br>१.३७६<br>१.९५८ |
| १५१ ते ३०० दिवस | १३:०:४६ +<br>युरिया | २८२.५<br>१५० | १.८८४<br>१.००० |

**टिप: वरील खतांच्या मात्रा मार्गदर्शनासाठी आहेत. माती परिक्षण व प्रत्यक्ष अनुभव यानुसार बदल करावेत. आजपर्यंतच्या अनुभवावरुन विद्राव्य खतांचा वापर अतिशय फायदेशीर आहे.**

**पारंपारिक खतांचा वापर:**

२०० ग्रॅम नत्र, ६० ग्रॅम स्फुरद आणि २५० ग्रॅम पालाश प्रती झाड अशी पारंपारिक रासायनिक खतां करीता शिफारस करण्यात येत आहे. दर हजारी (१०००) केळी झाडाकरीता खालील रासायनिक खते वापरावे.

| कालावधी | ग्रेड | हजारी लागणारी एकूण खते(किलो) | खत (ग्रॅम/झाड) |
|---|---|---|---|
| रोपे लागवडी वेळी खड्ड्यामध्ये | सुपर फॉस्फेट +<br>पोटॅश | १२५ किलो<br>१०५ किलो | १२५ ग्रॅम<br>१०५ ग्रॅम |
| लागवडी नंतर ३० दिवसांनी | युरिया | ६२ किलो | ६२ ग्रॅम |
| लागवडीनंतर ७५ दिवसांनी | युरिया +<br>सुपर फॉस्फेट +<br>सुक्ष्म अन्न द्रव्य +<br>मॅग्नेशियम सल्फेट | ६२ किलो<br>१२५ किलो<br>२५ किलो<br>२५ किलो | ६२ ग्रॅम<br>१२५ ग्रॅम<br>२५ ग्रॅम<br>२५ ग्रॅम |
| लागवडीनंतर १२५ दिवसांनी | युरिया +<br>सुपर फॉस्फेट | ६२ किलो<br>१२५ किलो | ६२ ग्रॅम<br>१२५ ग्रॅम |
| लागवडीनंतर १६५ दिवसांनी | युरिया +<br>पोटॅश | ६२ किलो<br>१०५ किलो | ६२ ग्रॅम<br>१०५ ग्रॅम |
| लागवडीनंतर २१० दिवसांनी | युरिया | ६२ किलो | ६२ ग्रॅम |
| लागवडीनंतर २५५ दिवसांनी | युरिया +<br>पोटॅश | ६२ किलो<br>१०५ किलो | ६२ ग्रॅम<br>१०५ ग्रॅम |
| लागवडीनंतर ३०० दिवसांनी | युरिया +<br>पोटॅश | ६२ किलो<br>१०५ किलो | ६२ ग्रॅम<br>१०५ ग्रॅम |

*मागे पहा...*

**आंतरपिक:**
केळीमध्ये आंतरपिक आर्थिक दृष्ट्या फायदेशीर आहे. केळीच्या दोन ओळीमध्ये किंवा जोडओळ पद्धतीमध्ये रिकाम्या जागी गादीवाफ्यावर कांद्याची लागवड करावी. केळी लागवडीच्या नंतर सुरवातीच्या काळात कांदा आंतरपिक घेता येते.

**आंतर मशागत-** शेत तण विरहित असावे. कोळपणी करुन जमीन भुसभुसीत ठेवावी. वेळोवेळी जास्तीची पिले कापत रहावी. प्रखर उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून केळीचे घड पानांनी झाकावे.

खोडवा ठेवण्यासाठी पिक फुलोऱ्यात आल्यावर (७ ते ९ महिन्यांनी) एक नविन तलवारीच्या पात्यासारखी पाने असलेला पिल ठेवावा. व इतर पिले कापून टाकावी.

**टिश्यूकल्चर केळी लागवड पारंपारीक बेणे लागवड पेक्षा फायदेशीर कशी?**

| टिश्यूकल्चर केळी लागवड | बेणे केळी लागवड (पारंपारिक) |
|---|---|
| १) रोपे एकसमान वयाची व जातीची असतात. | १) सर्व बेणे एकसमान वजनाचे व एकाच जातीचे मिळतील याची खात्री नसते. |
| २) रोपे निरोगी व जोमदार असतात. | २) बेणे (कंद) किड व रोग मुक्त नसतात. |
| ३) टिश्यू कल्चर केळी लागवडी मध्ये मातृवृक्षाचे सर्व गुणधर्म सारखे येतात. | ३) बेणे लागवड केळी मध्ये सर्व झाडांचे गुणधर्म सारखे नसतात. |
| ४) अधिक उत्पादन देणारी मातृवृक्षाची निवड असल्यामुळे उत्पादन अधिक मिळण्याची खात्री असते. | ४) बेणे वेगवेगळे असल्यामुळे अधिक उत्पादनाची खात्री नसते. |
| ५) पिक लागवडी पासून **११ ते १२** महिन्यात काढण्यास तयार होते. | ५) बेणे लागवडी पासून **१५ ते १६** महिन्यात पिक काढणीस तयार होते. |
| ६) पिकाची वाढ एकसमान होते. | ६) पिकाची वाढ एकसमान होत नाही. |
| ७) पिकाचा कालावधी **कमी** असल्यामुळे पाणी, मजूर व मशागतीचा खर्च कमी येतो. | ७) पिकांचा कालावधी **जास्त** असल्यामुळे पाणी, मशागत, मजूरीचा खर्च जादा येतो. |
| ८) **२८ ते ३० महिन्यात** एक मुख्य पिक व दोन खोडवे असे **तीन पिके** घेता येतात. | ८) **३० ते ३२ महिन्यात** एक मुख्य पिक व एक खोडवा अशी **दोन पिक** घेणे शक्य होते. |
| ९) **उत्पादन जास्त** आर्थिक फायदा जास्त. | ९) **उत्पादन कमी** आर्थिक फायदा कमी. |

**करपा रोगाचे नियंत्रणः**

पानांवरील ठिपके (करपा) रोग दिसून आल्यास खालील उपाय योजना करावी.

१) रोग ग्रस्त पाने काढून टाकावेत,

२) पानांवर बावीस्टीन १०० ग्रॅम + डायथेन एम ४५ किंवा कॉपर ॲक्सी क्लोराईड २५० ग्रॅम हे १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. सोबत औषधी पानावर चिकटण्यासाठी स्टिकर वापरावे.

३) हेच फवारणीचे औषध २५० मिली जमीनीतून झाडाच्या मुळांजवळ टाकावे. जमीनीत औषध टाकतांना स्टीकर मिसळू नये.

**घडांवर विद्राव्य खतांची फवारणी :**

० : ५२ : ३४ - हे खत २ ग्रॅम/लिटर पाण्यातून घडांवर १५ दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. खत पानावर चिकटण्यासाठी सोबत स्टिकर वापरावे.

**उत्पादनः**

टिश्यूकल्चर केळीची लागवड, जमिनीची मशागत, खते, पाणी व्यवस्थापन व्यवस्थित केल्यास नेहमीच्या केळी लागवडी पेक्षा **दुप्पट** उत्पादन सहज मिळते. तीन पट उत्पादन आल्याचीही उदाहरणे आहेत.

**रोपांची उपलब्धता/नोंदणी:**



**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि., जळगाव यांच्याकडे अधिक उत्पादन देणाऱ्या ग्रँडनैन जातीची दर्जेदार, निरोगी रोपे भरपूर प्रमाणात उपलब्ध असून रोपांची नोंदणी सुरु आहे. रोपांची उपलब्धता जूनच्या पहिल्या आठवड्या पासून सुरु होईल.**

***टिप: शेती ही निसर्गावर अवलंबून असते. त्यामुळे कंपनी रोपांची उगवण, वाढ व उत्पादन याची हमी घेत नाही.***


**संपर्क**

**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.**

जैन फूड पार्क, जैन व्हॅली, पो.बॉ. २०, जळगाव - ४२५ ००१. दूरध्वनीः ०२५७-२२६००३३/४४, फॅक्सः २२६११४४, टेलेक्सः ०७५३-२५५ जैन इन, केबल जैन्स्. ई-मेलः foodpark@jains.com

***आमच्या सर्व उत्पादनांच्या खरेदी, विक्री आणि सेवासंबंधी अधिक माहितीसाठी पुढील कार्यालयांशी किंवा अधिकृत वितरकांशी संपर्क साधावा.***

**ठाणे:** ०२२-२५४४३९९२; **नाशिकः** ०२५३-५९२७१८; **पुणे:** ०२०-५४३४८७२; **अहमदनगरः** ०२४१-२५५०१६९; **सांगली:** ०२३३-२३३३४७७; **सोलापूरः** ०२१७-२३५७२२०; **अमरावती:** ०७२१-६७४७३७; **नांदेडः** ०२४६२-२७४०४६; **औरंगाबादः** ०२४०-३३५४८२; **नागपूरः** ०७१२-५२१०९६; **पंढरपूरः** ०२१८६-२२६३१(पीपी); **इंदौरः** ०७३१-५१३१८९.



जैन पाईप | जैन ठिबक | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्यूकल्चर | जैन सौरबंब



9/TISSUE CULTURE-MAR/P1-2/161202/IM